
Read India
An imprint of Pratham Books

# सुंदर जग

हरमिन्दर ओहरी



RGF Pratham
SERIES

Original Story (*English*) Our Wonderful World by Herminder Ohri
© Rajiv Gandhi Foundation-Pratham Books, 2004

Second Marathi Edition: 2006

Illustrations: Herminder Ohri & Baaraan Ijlal
Design: Moonis Ijlal
Marathi Translation: Madhuri Pai


ISBN: 81-8263-096-7

Registered Office:
PRATHAM BOOKS
9, Charles Campbell Road, Cox Town,
Bangalore 560 005
✆ 080-25801462, 25801463

Regional Offices:
Mumbai ✆ 022-65162526
New Delhi ✆ 011-65684113

Typesetting and Layout by:
Pratham Books

Printed by:
Repro India Ltd.
Mumbai



Some rights reserved. This book is CC-BY-3.0 licensed.
Full terms of use and attribution available at:
http://www.prathambooks.org/cc

# सुंदर जग


लेखन
हरमिन्दर ओहरी

चित्रांकन
हरमिन्दर ओहरी
बारान इजलाल




मराठी रूपांतर
माधुरी पै


खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. तेव्हा पृथ्वीवर माणसेच नव्हती. देवाने विचार केला, या जगाची काळजी घेईल असे कोणीतरी मला हवे आहे.




‘‘त्याची चिंता कशाला ?
मी जंगलचा राजा आहे.
मीच या सगळ्या सृष्टीची
राखण करेन,’’ सिंहाने
गर्जना केली.




हत्ती झुलत झुलत म्हणाला, ''महाराज, आपण मला इतके शक्तिवान आणि डौलदार केले आहे. मीच या कामासाठी ठीक आहे.''



देवमाशाने प्रश्न केला, ‘‘ह्या सगळ्यांना पोहता कोठे येते ? इतर मासे आणि समुद्रातील प्राणी यांची काळजी हे घेऊ शकणार का? मी पाण्यातून डोके वर काढूनही बघू शकतो की जमिनीवर कोठे काय चालले आहे.’’




‘‘माझे अणकुचिदार दातच जगाची काळजी घ्यायला पुरेसे आहेत,’’
शार्कने आपले टोकदार दात विचकत सांगितले.




घार हसून म्हणाली, ‘‘जनावरे फक्त जमिनीवर लक्ष ठेऊ शकतील तर शार्क आणि देवमासा पाण्यावर. पण मी उंच भरारी घेऊन जमीन, आकाश आणि पाणी तिन्हींवर लक्ष ठेवू शकते.’’









देवाने लक्षपूर्वक सगळ्यांचे बोलणे ऐकले आणि म्हणाला, ''मी माणूस बनवणार.'' सर्व प्राणी विचारात पडले. माणूस कसा असेल ? त्याचे रंग रूप कसे असेल ?
त्याला पंख असतील ?
तो वाघासारखा धावेल?
तो माशासारखा पोहू शकेल ?
घारीसारखी उत्तुंग भरारी घेता येईल ?



सूर्य मावळला. रात्र झाली. देवाने अगदी पहिला पुरूष आणि स्त्री बनवली. दोघांच्या डोळ्यात चांदण्यांची चमक दिली. त्यांना ढगांसारखे काळे केस दिले, चंद्रासारखे पांढरी शुभ्र नखे आणि दात दिले. त्यांना धष्टपुष्ट हात आणि पाय तसेच बुद्धी दिली. हेतू असा की त्यांना नवनवीन गोष्टी करता येतील.




रात्र संपून दिवस उजाडला. आता देवाने मानवाची दुसरी जोडी तयार केली. या जोडीला स्वच्छ सूर्यप्रकाशासारखा गोरा रंग दिला, त्यांच्या डोळ्यात आकाशाची निळाई आणि त्यांच्या केसात सोनेरी किरणांची चमचम घातली.




दुपार झाली. सूर्य डोक्यावर आला. कडक ऊन मी म्हणत होते. तिसरी जोडी बनवायला देवाने हाच पिवळा प्रकाश वापरला. गर्द सावलीसारखे केस दिले. प्रखर सूर्याचा त्रास होऊ नये म्हणून देवाने त्यांना काळेभोर आणि तिरळे डोळे ही दिले.



संध्याकाळ झाली. निळ्याशार आकाशातून देव खाली डोकावत होता. शेवटच्या चौथ्या जोडीच्या अंगावर त्याने काळसर रंग टाकला. रात्रीसारखा रंग, मोत्यासारखे दात, टपोरे डोळे आणि नाकेला चेहरा घेऊन काळेसावळे स्त्री आणि पुरूष तयार झाले.




या स्त्री-पुरुषांना घडताना पाहून सगळे प्राणी आश्चर्यचकित झाले. हे लोक दोन पायांवर उभे होते. त्यांना अंगभर केस आणि पंख नव्हते. ''यांच्यापेक्षा कितीतरी वेगाने मी धावतो. माझ्या पंजाचा धपाटा हे काय सहन करणार ?'' सिंह गर्जला.



“अंगावर पट्टे असते तर ठीक होते,” झेब्रा म्हणाला. माणसापेक्षा आपणच सुंदर आहोत असे प्राण्यांचे मत होते.
“माझा राखाडी रंग सुरेख आहे, नाही का ?” हत्तीने विचारले.
“अंगावर ठिपके असते तर बरे झाले असते,” चित्ता बोलला.




माणसांचे छोटे-छोटे दात पाहून शार्क हसला. ''हे पोहणार कसे ? आणि हे काय आमची काळजी घेणार ?'' लहानमोठे सगळे मासे हसतहसत पाण्यात डुंबायला लागले. त्यांच्या हसण्याने पाण्यात बुडबुड्यांच्या उकळ्या फुटल्या.



देव गालातल्या गालात हसला. ''घाबरू नका. तुमचं पाहून माणूस धावणे, पळणे, हसणे, खेळणे, पोहणे सगळे शिकेल.''
''तुमच्यासारखे ठिपके आणि पट्टे तो आपल्या कपड्यांवर रंगवेल. त्याला उंच आकाशात आणि समुद्राच्या तळाशी नेऊ शकतील अशा वस्तू तो बनवेल. तुमच्याच मदतीने माणूस समुद्र, झाडेझुडपे, पशु-पक्षी या सगळ्यांची काळजी घेईल. चला, या सुंदर सृष्टीची काळजी घेण्याची शपथ घेऊया.''





देवाने सिंह, हत्ती, देवमासा आणि घार असे तऱ्हेतऱ्हेचे पशु-पक्षी तयार केले. त्यानंतर सर्वांची काळजी घेण्यासाठी माणूस घडवला. पशु-पक्ष्यांचा त्याला विरोध होता. त्यांच्या मते याची काहीच गरज नव्हती. शेवटी देवाने काय केले त्याचीच 'सुंदर जग' ही गोष्ट आहे.

*या मालिकेतील इतर पुस्तके*

रडी आणि ठुशी • नावेतील सहल

छुटकू कोळी • मोठे संकट

आमच्या वेगवेळ्या भाषेतील शीर्षकांच्या संपूर्ण माहितीसाठी
**www.prathambooks.org** ला लॉगऑन करा.

प्रथम बुक्स ना-नफा प्रकाशक आहेत जे उत्तम दर्जाची आणि स्वस्त दरात भारतातील विविध भाषेत लहान मुलांसाठी पुस्तके काढतात.

ISBN 81-8263-096-7

Sundar Jag (Marathi)
**Rs. 20.00**